"शेतकरी संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास : विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत 'इतिहास' या विषयामध्ये पिएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी

सादर केलेला पूर्व संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी

बचाटे श्रीनिवास दत्तात्रय

एम.ए.इतिहास, बि.एड्.

संशोधन पर्यवेक्षक

डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव

इतिहास विभाग प्रमुख,

श्री दत्त कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

हदगाव, ता.हदगाव,जि. नांदेड.-431712.

2021

"शेतकरी संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास:
विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा"

प्रस्तावना :

भारतीय इतिहासाचे सिंहावलोकन करताना इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात शेतकरी उपेक्षित राहीला आहे, हे स्पष्टपणे जाणवते मग त्यात स्वातंत्र्यपूर्व ब्रिटीश काळ असो की, स्वातंत्र्योत्तर कालखंड असो. शेती आणि शेतकरी या प्रश्नांसंदर्भात काही राजकर्त्यांनी त्या-त्या काळात गांभीर्याने दखल घेतली गेली नाही हे खेदाने नमुद करावे लागते. 80% जनता भलेही या व्यवसायावर निगडीत असली तरी कृषी व संबंधित प्रश्न कायमच लटकत राहीलेले दिसतात. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या वर्चस्वाच्या कालखंडात शेतसाऱ्याची पध्दत बदलली त्याचा परिणाम म्हणजे सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमीनी ताब्यात घेण्याची नोंद आहे. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतावरील वर्चस्वाच्या काळात वेगवेगळया ज्या जमीन महसुल पध्दती राबविण्यात आल्या जशा कायमधारा (जमीनदारी), रयतवारी, महालवारी इ. यातुन शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शोषण झाले हा इतिहास आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोषाची ठिणगी निर्माण झाली. त्याचाच परिपाक म्हणजे संबंध भारतात शेतकरी आंदोलने झाली, तंट्याभिल्ल या सारख्यांनी सावकारांच्याघरावर दरोडे घालून, सावकारांकडील गहाण ठेवलेले जमीनीचे कागदपत्र जाळली होती हा इतिहास सर्वज्ञ आहे. त्याने सावकारांकडून जमा केलेली संपत्ती सामान्य शेतकऱ्यांना वाटली होती याचेही ऐतिहासिक पुरावे आहेतच. या काळापर्यंत शेती शास्त्रावर शास्त्रशुध्द अशी मांडणी कोणी केलेली नव्हती. शोषणाची किनार लाभलेल्या या व्यवसायाचा असंतोष शास्त्रीय पृष्ठावर मांडण्यासाठी 19 व्या शतकाचे शेवटचे दशक उजाडावे लागले. तो काळ म्हणजे महात्मा ज्योतीराव फुले या कर्त्यासमाजसुधारकांच्या रुपाने. फुलेंनी शेतकरी वर्गाची केविलवाणी अवस्था स्वत: पाहिली, ती अवस्था शेतकरी वर्गातच वाढल्यामुळे, त्या झळा त्यांना भोगाव्या लागल्या होत्या. यातुनच पुढे शेतकरी वर्गात अस्मिता निर्माण करुन पूढे निर्माण होणाऱ्या चळवळींना वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाले.

पुढे 20 व्या शतकात शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे सांप्रदायिकीकरण करुन आंदोलन चिरडण्याचा इतिहास उपलब्ध आहे. संपूर्ण समाजव्यवस्था ज्यावर उभी आहे ती शेती उपेक्षित राहीली. शेती हा व्यवसाय अती प्राचीन मानवी उत्क्रांतीच्या प्रगतीच्या वाटचालीतला महत्वाचा टप्पा आहे. मोहेजोंदडो व हडप्पाच्या उत्खनावरुन प्रकाशात आलेल आहेच की, त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीच होता व शेतीवरच त्यांची अर्थव्यवस्था अवलंबून होती. हडप्पामध्ये सापडलेल्या धान्याच्या कोठारांवरुन ते सिध्द झालेले आहेच. वैदिक कालखंडात ऋग्वेदामध्ये शेतीचे उल्लेख वाचायला मिळतात. पुढील काळात मौर्य, गूप्त व मध्ययुगीन काळातील शेती व कृषक जीवनाचे संदर्भ आहेतच.

वर्तमान भारतातील कृषक जीवनावर दृष्टीक्षेप टाकला तर लक्षात येते की, शेती-मातीवर, गुराढोंरावर जिवापाड प्रेम करणारा कृषक अहोरात्र शेतात खपवून, मोत्यांचे पिक काढतो, तरी बाजारात मात्र कवडीची किंमत नसल्यामूळे त्याची माती होते, अशी खंत मराठी ग्रामीण वाङ्मयात व्यक्त झाली आहे. 'कधी पेटणार गा मातीत ज्योतीच्या वाती' अशी ठसठशीत वेदना कवी विठ्ठल वाघांसारख्यांनी आपल्याएका काव्यात मांडली आहे.

जगाचा पोशिंदा ऊन, वारा, पाऊस आदी संकटाशी सामना करुन संघर्ष करतो, पण त्याला घामाचा दाम मिळत नाही हे मात्र खणखणीत सत्य प्रत्येक कालखंडात अधोरेखीत झाले आहे त्याला काही सन्माननीय अपवाद आहेत. फुल्यांच्या 'शेतकऱ्यांच्या आसुडमध्ये' मांडलेली विदारक परिस्थिती सांप्रत काळातही फारसा फरक पडलेला नाही. असे खेदाने नमुद करावे लागते. एकीकडे दुष्काळ... दुसरीकडे पिकलेल्या मालाचं मोल नाही, अशाही काळात तो जगतो हा दुर्दम्य आशावाद तरी त्याला कोठून येतो ? हा प्रश्न इथल्या सांप्रत व्यवस्थेला पडावा.

भारतातील शेतकरी हा पूर्णत: शेतीवरच अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु येथील कृषीप्रधान अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचे काम येथील राज्यकर्त्यांकडुन झाले का ? यावर ऐतिहासिक अंगाने शोधकार्य होणे गरजेचे आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे का ? आज भारतीय शेतकरी दिवाळखोरीला गेलेला आहे, शेतकऱ्यांची ही अवस्था निर्माण होण्याचे कारण, हे येथील शासनकर्त्यांचे शेतकऱ्यांप्रती असलेले उदासिन धोरण आहे. शेत मालाला योग्य भाव न मिळणे, दुष्काळ, दारिद्र्य व येथील राज्याकर्त्यांची शेतकऱ्याप्रती

असलेली अनास्था या सर्व गोष्टी शेतकऱ्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत आहेत. त्यामुळेच जगाचा पोशिंदा शेतकरी हा आत्महत्या करत आहे. तर दुसरीकडे देशाच्या उद्योगपतींचे नावे जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तीच्या यादीत झळकत आहेत. अशा या कृषी-प्रधान भारतीय देशाचे असे विदारक चित्र निर्माण झाले आहे, त्यास सरकारची कोणती धोरणे कारणीभूत ठरत आहेत आणि हे चित्र बदलायचे असेल तर आपण आपल्या सरकारी धोरणात काय बदल केला पाहिजे, जेणे करुन यादेशाचा पोशींदा शेतकरी सुखी झाला पाहिजे. यासाठीच शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांविषयी आपुलकी असलेल्या, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारा, शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी चळवळ निर्माण करणारा, शेतकऱ्यांचा पक्ष असला पाहिजे अशी कल्पना पुढे आली या कल्पनेतुन शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सन 1978 साली कांद्याच्या किंमतीवरुन उद्भवलेल्या आंदोलनाने चाकण जि. पूणे येथे या चळवळीच्या माध्यमातुन सुरुवात झाली. शेतकरी संघटनेच्या या आंदोलनाने पुढील काळात संबंध महाराष्ट्रभर व्यापक रुप धारण केले. चाकण येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे ही चळवळ संबंध महाराष्ट्र भर उदयास आली.

शेतकरी संघटनेच्या चळवळीला परिणाम जसजशी संघटना प्रस्थापित होवू लागली. तसतशी संघटनेची व्यापकता अधिक वाढत गेली. शेतकऱ्यांना असे वाटू लागले की, आपले प्रश्न प्रभावीपणे शासन दरबारी मांडणारा हा एकच पक्ष हवा वाटू लागला. त्यामुळेच शेतकरी संघटनेची व्यापकता सबंध महाराष्ट्रभर वाढू लागली. परिणामी, शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन 1,2,3, जानेवारी-1982 साली सटाणा जि. नाशिक येथे पार पडले. सटाणा येथे पार पडलेल्या शेतकरी अधिवेशनात शेतकरी संघटना स्थापन झाल्याची ऐतिहासिक घोषणा करण्यात आली. या अधिवेशनाचे अध्यक्ष माधवराव बोरावके हे होते तर या अधिवेशनाचे नेतृत्व शरद जोशी यांनी केले. या अधिवेशनास नांदेड जिल्ह्यातुनही असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहीले होते. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा शेतकरी चळवळीला असलेला पाठिंबा, शेतकरी संघटनेवर असलेली निष्ठा, शेतकऱ्यांची बाजू घेवून शासन दरबारी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारा पक्ष असल्यामुळेच या भागातील असंख्य शेतकऱ्यांनी शेतकरी चळवळीला या भागातुनही पाठिंबा तर दिलाच शिवाय चळवळीतही सक्रीय सहभाग घेवून आपली शेतकरी संघटनेप्रती असलेली निष्ठा दाखवून दिली. त्यामुळे याशोध

कार्यात "शेतकरी **संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास: विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा"** या विषयाची निवड केली. या विषयामध्ये नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्याची व असंख्य कार्यकर्त्यांच्या कार्याची ऐतिहासिक माहिती मांडणार आहे.

जगात आठराव्या शतकात जी औद्योगिक क्रांती झाली. या औद्योगिक क्रांतीचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला. कारण या काळात भारतात ब्रिटिशांचे राज्य असल्याने ब्रिटिशांना त्या पध्दतीने अर्थव्यवस्था किफायतशिर पडते त्याच पध्दतीने आर्थिक खच्चीकरण करता येईल त्या पध्दतीने केले. अशा पध्दतीने ब्रिटिशांनी आपले आर्थिक धोरण अवलंबून भारतीय अर्थव्यवस्था पार कोलमडून टाकली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावला नाही. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांची बाजू घेवून आणि शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी शरद जोशी यांनी चाकण येथून शेतकरी चळवळीची सुरुवात केली. या चळवळीचा परिणाम हळूहळू सबंध महाराष्ट्राभर प्रभावित होवू लागला. त्यातुन शरद जोशी यांचे महाराष्ट्रातुन नेतृत्व पुढे आले. आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली आंदोलनाच्या माध्यमातुन शेतकरी चळवळ सबंध महाराष्ट्रभर पसरली होती. त्यामुळेच "शेतकरी संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा" या विषयाची निवड केली.

विषय निवडीचा उद्देश :

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. मात्र या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत आजही भारतीय शेतकरी भरडला जात आहे. याचे कारण म्हणजे येथील शासनकर्त्यांचे असलेले शेतकऱ्याप्रती उदासिन धोरण. त्याच बरोबर शेतकऱ्यांना अनेक नैसर्गिक संकटांनाही तोंड द्यावे लागते. या सर्व गोष्टींचा परिणाम शेतकऱ्यांच्या बाबतीत होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक कुठे तरी थांबावी आणि त्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांच्या संघर्षाला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्रात शेतकरी संघटनेची स्थापना करण्यात आली. याच शेतकरी संघटनेचा प्रसार पुढील काळात संपुर्ण महाराष्ट्रभर झाला. त्याचाच प्रभाव नांदेड जिल्ह्यात देखील पडलेला दिसून येतो. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी देखील या चळवळीला पाठिंबा दिला. त्यामुळेच संबोधनासाठी "शेतकरी

संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास: विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा" या प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

गृहितके :

1. नांदेड जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा मिळालेला आहे.
2. शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात व नांदेड जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या बाबतीत केलेले कार्य उल्लेखनीय आहे.
3. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या कार्यात गुणवंत पाटील हंगरगेकर यांचे विशेष स्थान आढळते.
4. राजकीय, प्रादेशिक पक्ष म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी संघटनेनी महत्वाची भूमिका बजावली आहे.
5. शेतकरी संघटनेच्या माध्यमातुन मा. गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी महाराष्ट्रातील राजकारणात शेतकऱ्यांचे नेतृत्व केले.
6. महाराष्ट्राच्या तुलनेत नांदेड जिल्ह्यात शेतकरी संघटनेचे नेते मोठ्या प्रमाणात आढळतात.
7. नांदेड जिल्ह्यांतर्गत शेतकरी संघटनेने केलेले कार्य ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचे आहे.

उद्दिष्ट्ये :

1. शेतकरी संघटनेच्या स्थापनेचा आढावा घेणे.
2.शेतकरी संघटनेच्या राजकीय, व सामाजिक वाटचालीवर प्रकाश टाकणे.
3. अर्थव्यवस्था व शेती व्यवस्थेची माहिती देणे.
4. समाजातील शेतकरी वर्ग व इतर वर्ग यांचे स्थान स्पष्ट करणे.
5. शेतकरी संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक दृष्टीकोणातुन प्रकाश टाकणे.
6. सरकारच्या शेतीविषयक धोरणाचा आढावा घेणे.
7. शेती मालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत करणे.
8. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्याचा आढावा घेणे.

संशोधनाची आवश्यकता :

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची मांडणी शासन दरबारी मांडण्याचे काम महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने केले. शरद जोशी यांच्या बरोबर गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी शासनाच्या अन्यायी धोरणाविरुध्द लढा दिला. त्यामुळेच शेतकरी संघटनेच्या कार्यावर प्रकाश टाकणे क्रमप्राप्त होते. याचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास होणे महत्वाचे आहे. त्यामुळेच संशोधनासाठी "शेतकरी **संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास: विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा**" या संशोधन विषयाची निवड केली त्याच अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्यावर संशोधन होणे आवश्यक ठरते.

संशोधन पध्दती :

"शेतकरी संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास: विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा" या विषयाच्या संशोधनासाठी संदर्भ संशोधन पध्दती, मुलाखत पध्दत या संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. शेतकरी संघटनेविषयी गुणवंत पाटील हंगरगेकर यांची भूमिका व त्यांच्या कार्यकर्त्यांची कार्यपध्दती तसेच त्यांच्या मुलाखती घेवून त्याव्दारे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे प्रामुख्याने या संशोधन विषयाची मांडणी केली जाणार आहे. संदर्भ संशोधन पध्दतीत अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ ग्रंथाचा समावेश होतो.

संशोधन साधने :

"**शेतकरी** संघटनेच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास:विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा" या विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक साधनांचा उपयोग होणार आहे. प्राथमिक संदर्भ साधनात "शेतकरी संघटक" हे मासिक त्याचबरोबर गुणवंत पाटील, हंगरगेकर आणि त्यांच्या समकालीन व्यक्ती व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती शिवाय इतर संदर्भ ग्रंथाचा उपयोग संशोधनासाठी होणार आहे.

प्रस्तुत प्रकरणाची मांडणी पुढील संभाव्य प्रकरणात केली जाणार आहे.

प्रकरण पहिले:

"प्रास्ताविक"

या पहिल्या प्रकरणात विषयाची प्रस्तावना विषय निवडीचा उद्देश संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पध्दती, संदर्भ साधने व नांदेड जिल्ह्याचा औद्योगिक व ऐतिहासिक आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण दुसरे :

शेतकरी संघटनेच्या उदयाची पाश्र्वभूमी

"**शेतकरी** संघटनेचा उदय" हे शोध प्रबंधातील दुसरे प्रकरण आहे. या प्रकरणात शेतकरी संघटनेचा उदय, विकास, स्थापना, स्थापनेचा उदय शेतकरी संघटनेच्या महाराष्ट्रातील व नांदेड जिल्ह्याच्या राजकीय वाटचालीचा आढावा यावर प्रकाश टाकला जाणार आहे.

प्रकरण तिसरे :

गुणवंत पाटील हंगरगेकर यांचे संघटनेच्या कार्यातील योगदान.

महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरुन जी चळवळ निर्माण झाली. त्या चळवळीचा प्रभाव संबंध महाराष्ट्रभर उमटला. शेतकऱ्यांनी उभारलेल्या आंदोलनाच्या माध्यमातुन सन 1982 साली नाशिक जिल्ह्यातील सटाणा येथे शेतकरी संघटनेची स्थापना झाल्याचे घोषीत करण्यात आले याचा प्रभाव नांदेड जिल्ह्याच्या परिक्षेत्रावरही पडला. नांदेड जिल्ह्यातुन असंख्य कार्यकर्ते शेतकरी चळवळीत सहभागी झाले. आणि या कार्यकर्त्यांच्या माध्यमातुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटनेने या भागात बरेच कार्य केले आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यात गुणवंत पाटील हंगरगेकर यांचेही योगदान फार महत्त्वाचे आहे. त्यांचेही कार्ये या ठिकाणी मांडले जाणार आहे.

प्रकरण चौथे :

नांदेड जिल्ह्यातील शेतकरी नेतृत्वाचा लढा

हे शोध प्रबंधातील चौथे प्रकरण आहे. या प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेतील कार्यकर्त्यांचा सहभाग, त्यांचे संघटनेच्या आंदोलनातील योगदान. त्यांनी केलेल्या सहकार्याच्या रुपाने गुणवंत पाटील हंगरगेकर यांना दिलेला पाठींबा व त्यांच्या इतर कार्याचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे :

शेतकरी संघटनेच्या कार्यात नांदेड जिल्ह्याची भुमिका

हे शोध प्रबंधातील पाचवे प्रकरण आहे. यामध्ये शेतकरी संघटनेच्या माध्यमातुन मांडलेल्या शेतकऱ्यांच्या अनेक न्याय मागण्यासाठी या भागात शेतकरी संघटनेने रास्ता रोको सारखी अनेक आंदोलने आणि चळवळी केल्या. शेतकऱ्यांना सरकारनी मोफत वीजपुरवठा करावा, त्यांच्या वरील कर्ज माफ करावे. त्यांना सवलतीच्या दरात कर्ज द्यावे, शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करुन द्यावे, शेतकरी पिक विमा कर्ज मंजूर करावे, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई सरकारने द्यावी. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरकारने आर्थिक मदत करावी. या न्याय मागण्यासाठी शेतकरी संघटनेने सरकार दरबारी मोर्चे, धरणे, सनदशिर मार्गाने आंदोलन करुन चळवळी केल्या.त्याच बरोबर शेतकरी संघटनेच्या ऐतिहासिक कार्याची माहिती तसेच शेतकरी संघटनेच्या आंदोलनात मांडलेले विविध ठराव, शासनाकडे दिलेले निवेदने आपल्यामागण्या मान्य करुन घेण्यासाठी केलेला पाठपुरावा व शेतकरी संघटनेच्या राजकीय कार्याचा आढावा घेवून संशोधनात्मकरितीने आढावा घेवून या प्रकरणाची ऐतिहासिक दृष्टीकोणातुन मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण सहावे :

उपसंहार व निष्कर्ष

हे शोध प्रबंधातील सहावे आणि शेवटचे प्रकरण आहे. या प्रकरणात उपसंहार व निष्कर्षाची मांडणी केली जाणार आहे.

वरील प्रस्तुत संशोधन आराखडा हा संभाव्य व माहितीच्या उपलब्धतेनुसार शेतकरी संघटनेच्या या भागातील कार्याची ऐतिहासिक माहिती मांडली जाणार आहे.

संदर्भग्रंथ :

1. जोशी शरद, ***शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती,शब्दांकन,*** प्रा.सुरेशचंद्र म्हात्रे, प्रा. सुरेश घाटे,प्रकाशन-जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, व्दितीयावृत्ती,6 नोव्हेंबर-2009.

2. जोशी शरद, ***बळीचे राज्य येणार आहे.*** प्रकाशक-जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,ऑक्टोंबर-2010.

3. सोळुंके श्रीकांत,महाराष्ट्रातील ***शेतकरी चळवळ,*** बी.रघुनाथ प्रकाशन,परभणी,ऑगस्ट-1996.

4. करपे राजाभाऊ, ***मराठवाड्यातील शेतकरी चळवळ,*** प्रकाशक, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जुन-2012.

5. चिल्ले रमेश, ***शेतकऱ्यांच्या यशोगाथा,*** गोडवा कृषी प्रकाशन, पुणे, प्रकाशिका- हर्षा रविंद्र काटोले, पुणे.

6. जोशी शरद, ***पोशिंद्याची लोकशाही,*** प्रका.जनशक्ती वाचक चळवळ,औरंगाबाद, प्रथमावृत्ती,10 नोव्हेंबर-2010.

7. खांदवे एकनाथ, ***शेतकरी संघटना ते स्वतंत्र भारत पक्ष वाटचाल,*** प्रकाशक- प्रा.डॉ. एकनाथ खांदवे, अहमदनगर, 10 डिसेंबर-2007.

8. कल्याणकर आबासाहेब, ***शेत,*** गोदावरी प्रकाशन, खरबी ता.भोकर जि. नांदेड, 15 ऑगस्ट 2009.

9) उमरीकर आनंत, ***आंदोलन,*** सुधारीत,तृतीयावृत्ती, 7 जुलै-2009.

10) परुळकर विजय,-योध्दा ***शेतकरी,*** जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, 6 जुन-2010.

11) बोरसे शिवनाथ, ***शेतकऱ्यांच्या समस्या शोध आणि बोध,*** वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, जानेवारी 2005.

12) प्रसाद ईश्वरी, ***भारत का किसान आंदोलन,*** प्रका. ग्रामीण साहित्यमाला, नई दिल्ली, प्रथम संस्करण,1933.

पाक्षिक :

1. म्हात्रे सुरेशचंद्र, शेतकरी(संपा.), शेतकरी संघटक, 6 एप्रिल-2011.
2. म्हात्रे सुरेशचंद्र,(संपा.), शेतकरी संघटक, 21 जून 2011.
3. म्हात्रे सुरेशचंद्र(संपा.), शेतकरी संघटक, 21 फेब्रुवारी1989.
4. म्हात्रे सुरेशचंद्र,(संपा.), शेतकरी संघटक, 06 नोव्हेंबर1997.
5. हबीब अमर,(संपा.), बळीराज्य,15 डिसेंबर- 1998.

मासिक :

1. कृषी अर्थमंथन, नोव्हेंबर2000.
2. सुमीती सुनीती सु.र. कार्यकारी (संपा.),आंदोलन शाश्वत विकासासाठी, डिसेंबर2002.
3. लढाऊ किसान, दिपावली विशेष, अंक 14 वा 18 नोव्हेंबर-2012.
4. लढाऊ किसान, मासिक वृत्तपत्र, अंक 15 वा 18 जानेवारी 2013.

त्रैमासिक:

1. कठारे रमाताई,(संपादक), कंधारपूर, एप्रिल-2011.
2. कठारे रमाताई,(मुख्य संपादक), कंधारपूर, जुलै ते सप्टेंबर-2012.

विशेषांक :

1. शेतकरी संघटक / नांदेड अधिवेशन विशेषांक, मार्च199 हबीब नगर,(कार्यकारी संपादक)
2. काळे वर्षा,अंनर्नाद, वर्ष पंधरावे, ऑक्टोंबर 2009.

स्मरणिका:

1. उमरीकर अनंत, मा. शरद जोशी अमृतमहोत्सव स्मरणिका, प्रका. मा. शरद जोशी अमृतमहोत्सव समिती, औरंगाबाद, 2009-2010.
2. हबीब अमर (संपादक), 10 वे संयुक्त अधिवेशन जालना स्मरणिका, प्रका.-लक्ष्मण वडले, जानेवारी-2005.

दैनिक :

1. दै.प्रजावाणी, दि.19.12.2012.
2. दै.पुण्यनगरी दि.24.01.2013.

संशोधक विद्यार्थी

बचाटे श्रीनिवास दत्तात्रय
एम.ए. इतिहास, बि.एड्.
Email-shrinivasbachate6811@gmail.com
मो.नं. 9096555927

संशोधन पर्यवेक्षक

डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव
इतिहास विभाग प्रमुख,
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,हदगाव, जि. नांदेड.
मो.नं.7350333214
tukarambokare58@gmail.com